# थोडक्यात



कृषी विषयक मार्गदर्शन करतांना चोपडा पंचायत समितीचे कृषी सहाय्यक एस. बी. सनेर

## मामलदे येथे कृषी विषयक मार्गदर्शन उत्साहात

तालुका प्रतिनिधी / १३ जानेवारी

चोपडा : भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालयाच्या समाजकार्य भाग ३ च्या क्षेत्रकार्यच्या मामलदे ग्रुप अंतर्गत 'कृषी विषयक मार्गदर्शन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात चोपडा पंचायत समितीचे कृषी सहाय्यक एस.बी.सनेर यांनी शेतकऱ्यांना शेततळे याविषयी विशेष माहिती दिली. त्यानंतर ठिबक सिंचन विषय व कृषी यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदीसाठी अर्थसहाय्य (अनुदानावर कृषी औजारे पुरवठा) या विषयी ग्रामस्थांना सखोल माहिती दिली. अध्यक्षस्थानी देवयानी भरत इंगळे, सरपंच व इतर सदस्य उपस्थित होते. क्षेत्रकार्यचे मार्गदर्शक डॉ.राहुल निकम यांनी लोकांनी एकतेने कसे रहावे, समाजात एकता कशी निर्माण करता येईल, शेतकऱ्यांना त्यांना मिळणाऱ्या योजना व अनुदानाचे स्वरूप कसे असते याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्षेत्रकार्य मार्गदर्शक प्रा. डॉ. राहुल निकम, विद्यार्थी हेमंत बाविस्कर, दिपक परदेशी, सागर अहिरे, धनराज राजपूत, योगेश धनगर, मुकेश पावरा, मिथुन पावरा, रेवानंद पाटील, सचिन रायसिंग, प्रविण सोनवणे, अनिता महाजन, सिमा माळी, पूजा थावरे यांनी केले. सुत्रसंचालन विजय कोळी यांनी तर आभार प्रदर्शन दिपक परदेशी यांनी केले.

देशोन्नती

जळगाव
रविवार दि. ९ ऑक्टोबर २०१६

जनजागृती | विविध सामाजिक संस्था, शाळा, महाविद्यालय यांचा सहभागी

# मामलदे येथे स्वच्छता जनजागरण रॅली उत्साहात

तालुका प्रतिनिधी / ८ ऑक्टोबर

**चोपडा :** समाजकार्य महाविद्यालय, चोपडा व जि. प. उच्च प्राथमिक शाळा, मामलदे तसेच एस. आर. पाटील, माध्यमिक विद्यालय, मामलदे यांच्या संयुक्त विद्यमाने मामलदे गावात स्वच्छता जनजागरण रॅली उत्साहात पार पडली.

रॅलीमध्ये समाजकार्य स्नातक तृतीय वर्षाचे विद्यार्थी, जि. प. शाळेचे विद्यार्थी, माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षकवृंद व ग्रामस्थ सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे आयोजन जि. प. उच्च प्राथमिक शाळा मामलदे येथे केलेले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक माध्यमिक विद्यालयाचे ए. एम. महाजन होते. या कार्यक्रमात समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा. डॉ. राहुल निकम यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. जीवनातील वैयक्तिक स्वच्छतेचे व सामाजिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.




जनजागृती रॅलीत महाविद्यालयातील सहभागी झालेले विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्ग

विद्यार्थ्यांनी परिसरातील स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. सर्वांनी मिळून स्वच्छता राखण्यासंदर्भातील सामूहिक शपथ ग्रहण केले.

रॅलीच्या माध्यमातून सर्व गावभर फिरून विद्यार्थ्यांनी विविध पोस्टर व घोषवाक्यांच्या माध्यमातून लोकांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. या कार्यक्रमात ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील व ग्रामसेवकासहीत ग्रामस्थांनी प्रतिसाद सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जि. प. शाळा, माध्यमिक यांनी सहकार्य केले. प्रा. डॉ. राहुल निकम यांच्या समवेत विद्यार्थी देवानंद पाटील, योगेश धनगर, हेमंत चावरेकर, विजय कोळी, दिपक परदेशी, सागर अहिरे, प्रविण सोनवणे, मिथुन पावरा, मुकेश पावरा यांनी जि. प. शाळेचे मुख्याध्यापक दुसाने सरांनी परिश्रम घेतले.

# जागतिक बालमजूरी विरोधी दिन उत्साहात

## भगिनी मंडळ चोपडा संचलित विशेष प्रशिक्षण केंद्र ५ व ६ येथे बालकामगारांच्या स्पर्धा, पालक मेळावा, बक्षिस वितरण

तालुका प्रतिनिधी / २३ जून

**चोपडा :** येथील भगिनी मंडळ चोपडा संचलित विशेष प्रशिक्षण केंद्र ५ व ६ येथे जागतिक बालमजूरी विरोधी दिन विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी बालकामगार विद्यार्थ्यांनी रामपुरा, पंचशिल नगर, पाण्डीवाडा, अलकरीवाडा या परिसरातून 'बंद करा, बंद करा बालमजूरी बंद करा', 'बालमजूरीवर एकच उपाय शिक्षण हा एकच पर्याय' अशा विविध घोषणा देत व बॅनर घेवून रॅली काढण्यात आली. व विशेष प्रशिक्षण केंद्र क्र. ५ येथे चित्रकला स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, पालक मेळावा आदी कार्यक्रम घेण्यात आले. या पालक मेळाव्यात पालकांना री. बा. या प्रकल्प संस्था जळगावच्या प्रकल्प संचालिका वैशाली कोकाटे यांनी शिक्षणाचे महत्त्व, शाळेत मिळणाऱ्या सुविधा, स्वच्छता, आरोग्य, बचतगट, शिक्षणात आर्थिकतेचे मार्गदर्शन व पालकांशी चर्चा केली. तसेच विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना वैशाली कोकाटे, आशफाक सैय्यद, प्रा. आशिष गुजराथी यांच्या हस्ते बक्षिस वाटप करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालय चोपडा येथील डॉ. धनवंत पाटील, डॉ. श्रध्दा पवार, फार्मासिस्ट शेख आसिफ, निता शिसवे यांनी बालकामगार विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून निदान व औषधोपचार करण्यात आले.

यावेळी बालमजूरी विरोधीदिनानिमित्त समाजकार्य महाविद्यालय, रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने बालकामगार विद्यार्थ्यांना समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य ईश्वर सौंदाणकर, प्रकल्प समन्वयक प्रा. आशिष गुजराथी, प्रा. अनंत देशमुख यांच्या हस्ते बिस्किट वाटप करून डॉ. धनवंत पाटील यांनी हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले व विद्यार्थ्यांनाही त्याचे प्रात्यक्षिक करण्यास लावून स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक भावसार यांनी केले तर प्रास्ताविक शाळेचे केंद्र प्रमुख दिपक बुवा यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार निता गुजराथी यांनी मानले. यशस्वीतेसाठी आशिष गुजराथी, पियुष चौधरी, संगिता [illegible], राजश्री गुजराथी, राधेश्याम पाटील, सुभाष पाटील आदींनी सहकार्य केले.



विजेत्या बालकामगारांना बक्षिसे वाटप करतांना वैशाली कोकाटे आशफाक सैय्यद, आशिष गुजराथी आदी (छाया : संजय बारी)

मागणी

अभाविपतर्फे भडगाव येथील देशमुख महाविद्यालयाच्या उपप्राचार्यांना निवेदन

# दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या पाल्यांची फी परत द्यावी

तालुका प्रतिनिधी / २३ जून

**भडगाव :** दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची माफ झालेली परीक्षा फी विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करा विद्यार्थ्यांना परत देण्यात यावी अन्यथा अभाविपतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात [illegible] निवेदन [illegible] करण्यात यावी असे आदेश दिले आहेत तसेच दुष्काळ निधी ही महाविद्यालयास प्राप्त झाला असून महाविद्यालयाने कोणत्याही विद्यार्थ्यास परीक्षा फी आकारणात वापस केली नसून [illegible] दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची थेट केली आहे तरी महाविद्यालयाने लवकरात लवकर विद्यार्थ्यांची



# चाळीसगाव येथे दूधसागर मार्गावर डांबरीकरणास प्रारंभ

तालुका प्रतिनिधी / २३ जून

**चाळीसगाव :** येथील दूधसागर मार्गावर माजी आ. राजीव देशमुख यांच्या उपस्थितीत डांबरीकरणाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष भोजराजपुंजी उपस्थित होते.

नगरसेवक विजय पाटील यांनी नारळ फोडून कामाचा प्रारंभ केला. यावेळी डॉ. विनायक चव्हाण, एस. डी. पाटील, प्रदिप निकम, हरी नाना, प्रशांत राजपूत, मनोहर पाटील, बाजीराव दौंड, विजय जाधव, रामचंद्र जाधव उपस्थित होते.

देशोन्नती
जळगाव
शनिवार, दि. २ जुलै २०१६

# चोपडा ग्रामपंचायत,संस्था, शाळा, महसूल मार्फत वृक्ष लागवड

वृक्ष दिंडी



चोपडा येथे भगिनी मंडळ संकुलातर्फे वृक्ष दिंडीला हिरवी झेंडी दाखवताना चंद्रहास गुजराथी, वसंतभाई गुजराथी, सविता पाटील, भारती बोरसे, प्रभावती पाटील, मुख्याध्यापक सुनील चौधरी

**चोपडा** - येथील भगिनी मंडळ शैक्षणिक संकुलातर्फे आज वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात येवून तसेच संस्थेच्या विविध विभागांच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्ष दिंडीचे पूजन वसंतभाई गुजराथी, डॉ. सुशीलाबेन शाह, सविता पाटील, चंद्रहास गुजराथी, भारती बोरसे, कांचन राणे, महिला मंडळ माध्य.चे मुख्या. सुनील चौधरी, मुख्याध्यापिका प्रभावती पाटील, प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, प्राचार्य राजेंद्र महाजन, प्राचार्य विना शेंदे, प्राचार्य उदय अग्रे, प्रा. आशिष गुजराथी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी चंद्रहास गुजराथी यांनी हिरवी झेंडी दाखवून शोभायात्रेला प्रारंभ करण्यात आला. संस्थेच्या विविध विभागांच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आल्यानंतर विद्यार्थ्यांनी उत्साहात परिसरात झाडांची रोपे लावून कृषि दिवस साजरा केला. वृक्ष दिंडीमध्ये राष्ट्रीय हरित सेनेचे विद्यार्थी, लेझीम पथक, कलशधारी विद्यार्थिनी, टाळ-मृदुंगधारी बाल वारकरी, संदेश देणारे फलक व घोषणा देणारे सुमारे १२०० विद्यार्थी व संस्थेच्या विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

**श्रीमती शरच्चंद्रिका सुरेश पाटील पॉलिटेक्निक**

यांच्यातर्फे शैक्षणिक संकुल व परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

लोकमत जळगाव, रविवार, दि.२५ फेब्रुवारी २०१८


## चहार्डीत स्तुत्य उपक्रम : १४५ जणांची तपासणी व औषधोपचार

# आरोग्य मार्गदर्शन आणि उपचार शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

चोपडा : भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालयाच्या एम.एस.डब्ल्यू. २ क्षेत्रकार्यांतर्गत चहार्डी येथील हनुमानमंदिरामध्ये नुकतेच आरोग्य मार्गदर्शन व तपासणी तसेच औषध उपचार शिबिर झाले.

या शिबिरात चोपडा येथील डॉ. चंद्रकांत बारेला व त्यांचे सहकारी यांच्या मार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली.

सुरुवातीला डॉ. बारेला यांनी आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. त्यात आरोग्याची काळजी कशी घ्यावी व वैयक्तिक स्वच्छतेविषयी माहिती



चहार्डी ता. चोपडा येथे आरोग्य शिबिरात मार्गदर्शन करतांना डॉक्टर.

देऊन एकूण ८७ महिला व ५८ पुरुष असे मिळून १४५ रुग्णांची तपासणी करून औषधोपचार केले.

सदर शिबिर यशस्वीतेसाठी क्षेत्रकार्य पर्यवेक्षक प्रा. डॉ. विनोद रायपुरे, तसेच मुख्याध्यापक राजेश बडगुजर, योगेश पाटील, सुदाम बाबर आणि समाजकार्य पारगत भाग दोनचे विद्यार्थी निलेश कोळी, गजानन करंदीकर, सागर पावरा, चेतना पाटील, अमोल कोळी, सागर सखाराम पावरा, कुंदन सपकाळे, सैनाज तडवी, वर्षा पाटील, शुभांगी पाटील, विकास अहिरे, प्रमोद न्हावी, खोदीबाई पावरी यांनी परिश्रम घेतले.



चोपडा येथे विद्यार्थ्यांना स्कूल कीटवाटपप्रसंगी दीपक गिरासे, भरत कोसोदे, पूनम गुजराथी, अश्विनी गुजराथी, एस.बी.कोळी, ईश्वर सौंदाणकर, आशिष गुजराथी, सुनील चौधरी, अरुण संदानशिव, ज्ञानेश्वर भागवत आदी मान्यवर.

# समाजकार्य महाविद्यालयात स्कूल कीटचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

चोपडा : यशस्वी होण्यासाठी खडतर परिश्रम आवश्यक आहे. परिश्रमाची स्वत:पासून सुरुवात केल्यास यश नक्की मिळेल. विद्यार्थ्यांना मिळालेल्या या मदतीची जाणीव ठेवत मदतीचा सुयोग्य असा वापर करत जीवनात मोठे यश संपादन करावे, असे प्रतिपादन तहसीलदार दीपक गिरासे यांनी केले. भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालयाच्या समाजकार्य पारंगत भाग-२ च्या क्षेत्रकार्य अंतर्गत गरजू विद्यार्थ्यांना स्कूल किट वाटप करण्यात आले होते. यासाठी पुणे येथील सेवा सहयोग या संस्थेचे सहकार्य लाभले. याप्रसंगी प्रमुख अतिथी गटविकास अधिकारी भरत कोसोदे यांच्या हस्ते स्कूल किटचे वितरण करण्यात आले.

या वेळी मंचावर भगिनी मंडळाच्या अध्यक्षा पूनम गुजराथी, सहसचिव अश्विनी गुजराथी, सहायक गटविकास अधिकारी एस. बी. कोळी, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, क्षेत्रकार्य पर्यवेक्षक प्रा. आशिष गुजराथी, मुख्याध्यापक सुनील चौधरी, अरुण संदनशिव, प्रा. ज्ञानेश्वर भागवत उपस्थित होते. याप्रसंगी महिला मंडळातर्फे १५० विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप करण्यात आले.

सकाळ
जळगाव, शनिवार, २४ मार्च २०१८
३

# चोपडावासीयांना दिला जलसाक्षरतेचा संदेश

## समाजकार्य महाविद्यालयाचा उपक्रम ; गृहभेटीप्रसंगी वाटली माहितीपत्रके

सकाळ वृत्तसेवा

चोपडा, ता. २३ : दिवसेंदिवस होणारी पाण्याची नासाडी, अतिवापर, प्रचंड प्रमाणात जमिनीतून होणारा उपसा यामुळे भीषण पाणीटंचाईला भविष्यात सामोरे जावे लागणार आहे. यावर नागरिकांना पाण्याचे महत्त्व समजावे यासाठी 'जलसाक्षरते'संदर्भात जनजागृती व्हावी, या उद्देशाने येथील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी, कर्मचाऱ्यांनी शहरात घरोघरी जाऊन जलसाक्षरतेबाबत पत्रके वाटून माहिती दिली. या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

'रहिमन पानी राखिये, बिन पानी सब सून' असे पाण्याचे महत्त्व संत कबिरांनी शेकडो वर्षांपूर्वी सांगत पाण्याचा वापर जागरूकतेने करण्याचा संदेश दिला होता. आज जगभर पाण्याची समस्या भेडसावत आहे. चोपडा शहरालाही पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. २२ मार्च जागतिक जल दिनानिमित्त येथील भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालयातील एम. एस. डब्ल्यूच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रकार्यांतर्गत पाण्याचे महत्त्व व वापर यासंदर्भात चोपडा शहरातील विविध भागात गृहभेट देऊन जलजागृतीचा कार्यक्रम राबविला.

शहरातील सुंदरगढी, पारधीवाडा, भाग्योदयनगर, समतानगर, फुलेनगर, तापमातीनगर, धाळेश्वर दरवाजा परिसर, मल्हारपुरा, स्वस्तिक टॉकीज परिसर, गौतमनगर, बसस्थानक परिसर, पंकजनगर, बोरोलेनगर अशा विविध भागात विद्यार्थ्यांनी गृहभेटी देऊन लोकांना पाण्याचे महत्त्व व काटकसरीने वापर करण्याबाबत माहिती दिली. गृहभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी घरोघरी पाण्याच्या वापरासंदर्भातील माहितीपत्रके वाटली. माहितीपत्रकांच्या माध्यमातून लोकांना पाण्याचे मोल व त्याचा वापर काटकसरीने कसा करावा, याविषयीची माहिती देण्यात आली.



### उपक्रमासाठी सरसावले हात!

उपक्रमाला नगरसेविका अश्विनी गुजराथी यांचे सहकार्य लाभले. क्षेत्रकार्य पर्यवेक्षक प्रा. आशिष गुजराथी, डॉ. विनोद रायपुरे यांनी गृहभेटीच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. संस्थेच्या अध्यक्षा पूनम गुजराथी व प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### असा दिला संदेश...

- पाणी हेच जीवन, त्याचा जपून करावा वापर.
- पाणी कधी शिळे होत नाही, साठविलेले पाणी फेकू नका.
- नळ आल्यावर भांडी धुण्यास जास्त पाणी वापरू नका.
- पिण्याच्या पाण्याचा साठा जास्त ठेवा, पाण्याचा जपून वापर करा.
- नळांना तोट्या बसवा, पाणी भरून झाल्यावर नळाची तोटी बंद करा.
- लक्षात ठेवा पैसे निर्माण करू शकतो. मात्र, पाणी नाही.



चोपडा : पारधीवाडा भागात जलजागृतीची पत्रके वाटताना प्रा. आशिष गुजराथी, डॉ. विनोद रायपुरे, डॉ. ईश्वर सौंदाणकर व विद्यार्थी.

लोकमत जळगाव, सोमवार, दि. १५ ऑक्टोबर २०१८ 



चोपडा तालुक्यातील आदिवासी पाड्यांवर झालेल्या शिबिरप्रसंगी डॉ.नीता जैयस्वाल व डॉ.प्राजक्ता भामरे, सोबत आशिष गुजराथी आदी.

# सातपुड्यातील दुर्गम भागात आरोग्य जागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**चोपडा :** सातपुड्यातील दुर्गम भागातील आदिवासींच्या पाड्या वस्त्यांवर जाऊन त्यांना उत्तम स्वास्थ्याविषयी जाणीव करून देत गरजूसाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत आरोग्य शिबिर घेण्यात आले. यात ३०० जणांची आरोग्य तपासणी झाली. भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर झाले.

धनाजी नाना प्राथमिक आश्रमशाळा, सत्रासेन, ता.चोपडा येथे समाजकार्य महाविद्यालयाच्या समाजकार्य पारंगत-२ च्या विद्यार्थ्यांनी प्रा.आशिष गुजराथी, प्रा.डॉ.विनोद रायपुरे, प्रा.ज्ञानेश्वर भागवत यांच्या सहकार्याने हे शिबिर झाले.

यात बालरोग तज्ज्ञ डॉ.नीता जैयस्वाल आणि स्त्री रोगतज्ज्ञ डॉ.प्राजक्ता भामरे यांनी विनामूल्य सेवा दिली. या शिबिरादरम्यान सत्रासेन, गोरचिडा, उत्तमनगर परिसरातील ३०० मातांची व बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिराकरिता प्रवीण मिस्त्री व संजीव गुजराथी यांनी ६० हजार रुपयांच्या औषधींचे विनामूल्य वाटप रुग्णांना केले. धनाजीनाना आश्रमशाळेचे संचालक ज्ञानेश्वर भादले, मुख्याध्यापक महाजन व शिक्षकांनी सहकार्य केले.

यशस्वितेसाठी पूनम गुजराथी, आशिष गुजराथी, प्रसन्न गुजराथी, प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, पी.एस. पाटील यांनी परिश्रम घेतले.

लोकमत जळगाव, गुरुवार, दि. ३१ जानेवारी २०११ २

# चोपडा येथे ग्रामस्वराज्य पदयात्रेतून जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

चोपडा : गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव व भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात बुधवारी महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त ग्रामस्वराज्य पदयात्रा काढून जनजागृती करण्यात आली.

जळगाव वनविभागाचे उपवनसंरक्षक मोराणकर यांनी पदयात्रेस हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला. गांधी चौकातील गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पदयात्रेची सुरुवात झाली. विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी यांच्या निवासस्थानी वसंतकाका गुजराथी यांनी गांधी रिसर्च फाउंडेशन येथील कार्यकर्ते सागर चौधरी व सुनील पाटील यांचा सत्कार केला. त्यानंतर चिंच चौक मार्गे ही पदयात्रा नागलवाडी, वराड, शेनपाणी, गौर्यापाडा, बोरअजंटी या गावांमध्ये गांधीविचारांची जनजागृती करणार आहे. पदयात्रेचा समारोप वैजापूर येथे होईल. पदयात्रेचे चार दिवसांचे नियोजन आहे.

या पदयात्रेत अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील गांधी विचारांनी प्रभावित, गांधी यांचे अर्थशास्त्र या विषयात पीएचडी धारक प्राध्यापक डॉ. मार्क लिंडले, गांधी रिसर्च फाउंडेशनचे समन्वयक उदय महाजन, बा-बापू १५० मोहिमेचे समन्वयक प्रेरित, पदयात्रेचे नेतृत्व करणारे सागर चौधरी, पदयात्रेचे समन्वयक सुधीर पाटील, मुख्याध्यापक बी.डी.बी.पाटील, पर्यवेक्षक प्रा. आशिष गुजराथी, डॉ. विनोद रायपुरे, प्रा. ज्ञानेश्वर भामरे, प्रा.डॉ. विष्णु गुंजाळ व विद्यार्थी सहभागी झाले.

सकाळ गुरुवार, ३१ जानेवारी २०११ ४

» अवतीभवती



चोपडा : ग्रामस्वराज्य पदयात्रेत सहभागी झालेल्या विद्यार्थिनी.

## ग्रामस्वराज्य पदयात्रेने वेधले चोपडावासीयांचे लक्ष

चोपडा : गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव व समाजकार्य महाविद्यालयात चोपडा यांच्यातर्फे आज ग्रामस्वराज्य पदयात्रा काढण्यात आली. जळगाव वनविभागाचे उपवनसंरक्षक मोराणकर यांनी पदयात्रेस हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेस प्रारंभ केला. यावेळी गांधी चौकातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून पदयात्रेची सुरवात झाली. गांधी चौकातून, राणी लक्ष्मीबाई चौक, गुजराथी गल्ली या मार्गाने पदयात्रा नेण्यात आली. माजी विधानसभाध्यक्ष अरुणभाई गुजराथी, गांधी रिसर्च फाउंडेशन येथील कार्यकर्ते सागर चौधरी, सुनील पाटील यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर चिंच चौक मार्गे ही पदयात्रा नागलवाडी, वराड, शेनपाणी, गौर्यापाडा, बोरअजंटी या गावांमध्ये गांधीविचारांची जनजागृती करणार असून, पदयात्रेचा समारोप वैजापूर येथे होईल, असे पदयात्रेचे चार दिवसांचे नियोजन आहे. प्रा. डॉ. मार्क लिंडले, उदय महाजन, सागर चौधरी, सुधीर पाटील, मुख्याध्यापक डी. बी. पाटील, प्रा. आशिष गुजराथी, डॉ. विनोद रायपुरे, प्रा. ज्ञानेश्वर भामरे, प्रा. डॉ. विष्णु गुंजाळ, प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर आदींनी सहकार्य केले.

लोकसत्ता WWW.LOKSATTA.COM गुरुवार, ३१ जानेवारी २०११ ५

## समाजकार्य महाविद्यालयातर्फे ग्रामस्वराज्य पदयात्रा

चोपडा

शहरात गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव आणि समाजकार्य महाविद्यालय यांच्या वतीने महात्मा गांधी पुण्यतिथीचे औचित्य साधून ग्रामस्वराज्य पदयात्रा काढण्यात आली.

यावल वनविभाग, जळगाव येथील उपवनसंरक्षक मोराणकर यांनी पदयात्रेस हिरवा झेंडा दाखविला. याप्रसंगी गांधी चौकातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून पदयात्रेची सुरुवात झाली. राणी लक्ष्मीबाई चौक, गुजराथी गल्ली या मार्गाने पदयात्रा विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी यांच्या निवासस्थानी गेली.

या ठिकाणी वसंतलाल गुजराथी यांनी गांधी रिसर्च फाउंडेशनचे कार्यकर्ते सागर चौधरी, सुनील पाटील यांचा सत्कार केला. त्यानंतर चिंच चौक मार्गे पदयात्रा नागलवाडी, वराड, शेनपाणी, गौर्यापाडा, बोरअजंटी या गावांमध्ये गांधी विचारांची जनजागृती करणार असून समारोप वैजापूर येथे होईल, असे पदयात्रेचे चार दिवसांचे नियोजन आहे. या पदयात्रेत वॉशिंग्टन येथील गांधी विचारांनी प्रभावित आणि 'गांधी यांचे अर्थशास्त्र' या विषयातील पी.एचडीधारक प्रा. डॉ. मार्क लिंडले, गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगावचे समन्वयक उदय महाजन, बा-बापू १५० मोहिमेचे समन्वयक प्रेरित, पदयात्रेचे नेतृत्व करणारे सागर चौधरी, पदयात्रेचे समन्वयक सुधीर पाटील, चोपडा वनक्षेत्रपाल पी. बी. पाटील, मुख्याध्यापक डी. बी. पाटील आदींसह विद्यार्थी सहभागी झाले आहेत. पदयात्रेसाठी समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांनी सहकार्य केले.



चोपडा येथे गांधी रिसर्च फाऊंडेशन आणि समाजकार्य महाविद्यालय यांच्या वतीने महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त ग्रामस्वराज्य पदयात्रा काढण्यात आली (छाया - श्रीकांत भंगे)

# निमगव्हाणला विविध स्पर्धा उत्साहात



निमगव्हाण, ता. चोपडा : तालुक्यातील निमगव्हाण येथे महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम अंतर्गत 'एक गाव एक गणपती' या मंडळाच्यावतीने गणेशोत्सव काळात मुला मुलींसाठी संगीत खुर्ची स्पर्धा, लिंबू चमचा स्पर्धा तसेच जि.प. केंद्र शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान परीक्षा घेण्यात आली.

स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच मंगला कैलास पाटील, विकास सोसायटीचे व्हा.चेअरमन प्रवीण बाविस्कर, ग्रामसेवक जनार्दन विसावे, तंटामुक्ती गाव समितीचे अध्यक्ष धनराज बाविस्कर, ग्रा.पं. सदस्य संभाजी पाटील, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र भाटिया, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील कोळी, मुख्याध्यापक प्रदीप चव्हाण आदी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानचिन्ह पेन व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर मंडळाच्यावतीने पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यात चोपडा समाजकार्य महाविद्यालयातील नाट्य विनोद ग्रुपचे कलावंत दीपक सैंदाणे, चंपालाल पाटील, किरण बागुल, दीपक बनसोडे ,विजय कोळी, रोहित पवार यांनी 'महिला सक्षमीकरण' या विषयावर आधारित समाज प्रबोधनपर पथनाट्य सादर केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत सदस्य तथा तंटामुक्ती समितीचे सदस्य अनिल शिवाजी बाविस्कर, संभाजी पाटील, अध्यक्ष उमेश बाविस्कर, सचिव अनिल पाटील, पंकज सपकाळे, किशोर बाविस्कर, केतन पाटील, समाधान मोतीराळे , अनिल सपकाळे, प्रकाश पाटील, प्रशांत बाविस्कर, योगेश कोळी, जयेश बाविस्कर, प्रदीप बाविस्कर, दीपक बाविस्कर, लिलाधर बाविस्कर आदी युवकांनी परिश्रम घेतले.

समाजातील कुष्ठरुग्ण, संसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून त्यांना उपचाराखाली आणणे, संसर्गिक साखळी खंडीत करुन कुष्ठरोग निर्मूलन करणे हे या मोहिमेचे ध्येय राहणार आहे. अंगावर फिक्कट लालसर रंगाचा न खाजणारा चट्टा कुष्ठरोगाचा असू शकतो. कानाची पाळी जाड होणे, चेहरा लालसर, तेलगट, अंगावर गाठी येणे, त्वचेशी सलग्न

या मोहिमेंतर्गत सर्वेक्षणासाठी आलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांना जनतेने सहकार्य करावे, असे आवाहनही वैद्यकीय अधिक्षक डॉ. बी. पी. बाविस्कर यांनी केले आहे.



# चोपडा येथे समाजकार्याचे कौशल्य विषयावर परिसंवाद

निमगव्हाण ता. चोपडा : भगिनी मंडळ संचलित चोपडा समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथील समाजकार्य पारंगत भाग -१ विद्यार्थींचा क्षेत्रकार्य कार्यक्रमाअंतर्गत समाजकार्याची कौशल्य या विषयावर परिसंवाद कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख उपस्थिती म्हणून भगिनी मंडळाच्या अध्यक्षा पूनमबेन गुजराथी तसेच तालुका समन्वयक (स्वच्छ भारत मिशन) पंचायत समिती चोपडा येथील जितेंद्र महाजन, श्री संत सावता माळी युवक संघ महाराष्ट्र राज्याचे चोपडा तालुक्याचे संपर्क प्रमुख महेंद्र माळी हे उपस्थित होते. शुभम धनगर, योगेश धनगर, निलेश गवळी या विद्यार्थ्यांनी माहिती मिळविणे, ग्रामीण शिबीर आदी विषयावर परिसंवाद साधला. प्रा. अनंत देशमुख, प्रा.डी. जी. भागवत, प्रा. संबोधी देशपांडे यांनी काम पाहिले. सूत्रसंचलन व आभार सपना चौधरी यांनी केले.

देशोन्नती गुरूवार, दि.१[illegible] जानेवारी २०१८



...त शासकीय कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना मान्यवर, दुसऱ्या छायाचित्रात चोपडा येथील भगिनी मंडळ शैक्षणिक संकुलाच्यावतीने महिला मंडळ व्हॉलंटरी स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त साडी परिधान ...ार्थिनी व क्रांतीसूर्य म.जोतीराव फुलेंच्या वेशातही विद्यार्थिनी तर शेवटच्या छायाचित्रात पिंपळगाव हरेश्वर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना प्राथमिक विद्या मंदिराचे शिक्षकवृंद (छाया : भानुदास चव्हाण, संजय बारी)

# ...ात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती विविध ठिकाणी उत्साहात

## ...पडा, पिंपळगाव हरेश्वर येथील शाळा, विविध कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन, अभिवादन करण्यात आले

सतिष पाटील, सरोजनी परखड, विजय क्षीरसागर, किशोर पाटील यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**पोलिस स्टेशन**

येथील पोलिस निरीक्षक नजीर शेख यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येवून सर्वांतर्फे त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पोलिस उपनिरीक्षक विश्वास पाटील, पो.कॉ.सचिन पोळ, पो.कॉ.जयसिंग राठोड, दिनेश मारवडकर, सुनील माळी, ईस्माईल शेख यांच्यासह पोलिस कर्मचारी उपस्थित होते. तसेच रजिस्टर ऑफीसमध्ये देखील सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी गोपाल महाजन यांच्यासह रजिस्टर ऑफीसचे कर्मचारी व वेंडर संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**चोपडा** - विसाव्या शतकाला भारताने दिलेली अनमोल देणगी म्हणजे क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले होय. महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक उन्नतीचा पाया ज्योतिबा आणि सावित्रीबाई या दाम्पत्याने घातला आहे. आजही त्यांच्या विचारांची समाजाला नितांत गरज आहे. त्यांच्या या अलौकिक कार्याची दखल घेत सावित्रीबाईंनाही भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार दिला जावा, असा विचार विधानसभेचे माजी सभापती प्रा.अरुणभाई गुजराथी यांनी मांडला. येथील भगिनी मंडळ शैक्षणिक संकुलाच्यावतीने महिला मंडळ व्हॉलंटरी स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककामार्फत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंचावर भगिनी मंडळाच्या अध्यक्षा पूनम गुजराथी, सहसचिव अश्विनी गुजराथी, केंद्रप्रमुख कुमुद बाविस्कर, संस्थेतील विविध विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना खाऊ वाटप करण्यात आला. महिला मंडळ व्हॉलंटरी स्कूलमधील उपशिक्षक जितेंद्र जोशी यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट एकच प्रभावीपणे मांडला. सूत्रसंचालन माध्यमिक विभागातील एस.बी.पाटील यांनी, प्रास्ताविक सी.पी.चौधरी यांनी तर आभार प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अरुण संदानशिव यांनी केले.

यशस्वितेसाठी समाजकार्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.आशिष गुजराथी, प्रा.मोहिनी उपासनी यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास संस्थेच्या विविध विभागातील शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर बंधु-भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते.

**पिंपळगाव हरे. ता.पाचोरा** - पिंपळगाव हरेश्वर येथील खाजगी प्राथमिक विद्या मंदिरात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस शिक्षक, शिक्षिका यांच्या वतीने माल्यार्पण करण्यात येवून अभिवादन करण्यात आले. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगण्यात आली. सावित्रीबाई फुले यांनी उद्धारकार्यातील मुलींसाठी स्वतः शिक्षण घेवून शिक्षित होवून शाळा काढल्या व त्यांना शिक्षण दिले. तसेच त्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला यासाठी मुलींच्या शाळा काढल्या, अशी माहिती देण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक एस.एस.मक्रानपुरे, सर्व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

देशदूत
जळगाव आवृत्ती, मंगळवार, दि. १९ डिसेंबर २०१७ पान नं. ६

# समाजकार्य महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिरास प्रारंभ
## स्वच्छ भारत अभियान, शौचालय निर्मिती जनजागृतीवर भर

चोपडा. । दि. १८। प्रतिनिधी



भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी श्रमसंस्कार शिबीरास तालुक्यातील माचले येथे प्रारंभ करण्यात आला. शिबीराच्या उद्घाटनाचा मान येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनी कु.दिपाली वासुदेव बाविस्कर हिला देण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष कृउबा सभापती जगन्नाथ पाटील तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सिंधुबाई कोळी, भगिनी मंडळ संस्थेच्या अध्यक्षा पूनम गुजराथी, सहसचिव अश्विनी गुजराथी, चंद्रशेखर पाटील, उपसरपंच संतोष पाटील, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक उद्धव पाटील, भगिनी मंडळ संस्थेतील विभागप्रमुख मुख्याध्यापक एस.डी. चौधरी, अरुण संदानशिव, संजय चौधरी, प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, राजेंद्र महाजन उपस्थित होते. तसेच स्वच्छ भारत अभियान डिजीटल इंडीया व बेटी बचाओ-बेटी पढाओ संदर्भातील चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा पुनम गुजराथी यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी बोलतांना पुनम गुजराथी म्हणाल्या, आपल्या घरापासूनच स्वच्छता करण्यास सुरुवात झाली तर आपोआप आपल्या समाजात परीवर्तन होईल. मुली प्रमाणेच मुलांनी देखील घरात कामासाठी हातभार लावला तर मुला मुलींमधील फरक कमी होईल. तसेच विद्यार्थ्यांनी समाजकार्य शिक्षणाची शाखा निवडल्याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील यांनी समाजा पर्यंत जाऊन समस्यांचे निराकरण करणे, विविध सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करणे आवश्यक असून समाजकार्य महाविद्यालयाने आतापर्यंत गावात उल्लेखनीय कार्य केल्याचे मनोगतात सांगितले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, मुख्याध्यापक एस डी चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविकात कार्यक्रम अधिकारी प्रा.आशिष गुजराथी यांनी समाजकार्य महाविद्यालयाने क्षेत्रकार्यांतर्गत राबविलेले उपक्रम व ग्रामस्थांचे लाभलेले सहकार्य तसेच शिबीरादरम्यान करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन मोहीनी पाटील हिने तर आभारप्रदर्शन अमृता पाटील हिने केले. याप्रसंगी प्रा.अनंत देशमुख, प्रा.शैलेश पाटील, प्रा.डॉ. विनोद रायपुरे, प्रा.संबोधी देशपांडे, रुपाली देसाई यांच्यासह ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

२४ डिसेंबर पर्यंत चालणाऱ्या शिबिरात श्रमदान, जनजागृतीपर स्पर्धा परीक्षा, पर्यावरण प्रदूषण, अवयवदान-रक्तदान महत्व, अंधश्रद्धा निर्मूलन, नेट-मोबाइल बँकिंग, सोशल मीडिया व समाजावर होणारा परिणाम या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

लोकमत जळगाव, मंगळवार, दि. १९ डिसेंबर २०१७ २

हॅलो जळगाव

महत्त्वाचे



माचले येथे हिवाळी श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

## हिवाळी श्रमसंस्कार विशेष शिबीरास प्रारंभ

चोपडा : येथील भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी श्रमसंस्कार शिबीरास तालुक्यातील माचले येथे प्रारंभ करण्यात आला. या शिबीराच्या उद्घाटनाचा मान येथील जि. प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनी दिपाली वासुदेव बाविस्कर हिला देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कृउबा सभापती जगन्नाथ पाटील तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सिंधुबाई कोळी, भगिनी मंडळ संस्थेच्या अध्यक्षा पूनम गुजराथी, सहसचिव अश्विनी गुजराथी, चंद्रशेखर पाटील, उपसरपंच संतोष पाटील, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक उद्धव पाटील, भगिनी मंडळ संस्थेतील विभागप्रमुख मुख्याध्यापक एस.डी. चौधरी, अरुण संदानशिव, संजय चौधरी, प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, राजेंद्र महाजन हे उपस्थित होते. यावेळी 'स्वच्छ भारत अभियान' 'डिजीटल इंडीया व बेटी बचाओ-बेटी पढाओ' यासंदर्भातील चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

# चोपड्यात समाजकार्य महाविद्यालयाचे 'कुष्ठरोग शोध अभियान'

। चोपडा । प्रतिनिधी।

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय व उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने चोपडा येथे राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन मोहीम अंतर्गत 'कुष्ठरोग शोध अभियान 'कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सदर म ोहिमेअंतर्गत तपासणीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समाजकार्य महाविद्यालयातील तृतीय वर्ष समाजकार्य स्नातक (ह.ष.इ.ड.थ.) चे १५ विदयार्थी व १५ विद्यार्थिनीची निवड करण्यात आली असून, विद्यार्थ्यां मार्फत कुष्ठरोग निर्मूलनासाठी घरोघरी सर्वेक्षण करण्यात येणार आहे .त्यासाठी चोपडा शहरातील झोपडपट्टी विभागात सर्वेक्षण बाबत प्रशिक्षण देण्यात आले. समाजातील प्रत्येक व्यक्तिंची तपासणी करण्यात येणार असून,त्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याबाबत आर.एस.पाटील उपजिल्हा रुग्णालय चोपडा,जीवन पाटील,आर.जे. पाटील (कुष्ठतंत्रज्ञ ) चोपडा यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीस प्रा.डॉ.राहुल निकम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर प्रमुख अतिथींचे स्वागत प्रा.आशिष गुजराथी व प्रा.डॉ.उत्तम .सोनकांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदनकार ,तृतीय वर्ष समाजकार्य स्नातक (ह.ष.इ.ड.थ.) चे वर्ग प्रमुख प्रा.डॉ. राहुल निकम व प्रा.डॉ. मारोती गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.





शाहीर अण्णाभाऊ साठे, लो. टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना डॉ. राहुल निकम आदी. [illegible]

## अण्णाभाऊ साठेंनी केले स्त्रीसक्षमीकरणाचे कार्य - डॉ. निकम

चोपडा (तालुका प्रतिनिधी) : [illegible]

देशोन्नती



विश्व आदिवासी दिवसानिमित्त प्रा नारसिंग वळवी यांना शुभेच्छा देतांना प्रा आशिष गुजराथी

## क्रांती दिन व आदिवासी दिन उत्साहात

चोपडा (तालुका प्रतिनिधी) : येथील महिला मंडळ कॉ. स्कूलमध्ये समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत क्रांतीदिन व विश्व आदिवासी दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने शहीद भगतसिंग व आदिवासी आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी क्रांतीकारी शहीद भगतसिंग-राजगुरु-सुखदेव यांच्या बद्दल जितेंद्र जोशी व प्रा. डॉ. विष्णु गुंजाळ यांनी विचार मांडले. तसेच आदिवासी दिवसाचे औचित्य राखून महाविद्यालयातील प्रा.नारसिंग वळवी यांचा रासेयो प्रमुख प्रा. आशिष गुजराथी यांनी सत्कार केला. त्याचप्रमाणे दोन आदिवासी विद्यार्थ्यांचा प्रा. मोहिनी उपासनी यांनी गुलाब पुष्प देवून सत्कार केला. अध्यक्षस्थानी उमवि समाजकार्य अभ्यासमंडळाचे अध्यक्ष डॉ.गुंजाळ हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अरुण संदानशिव, प्रा. डॉ.विनोद रायपुरे, प्रा.शैलेश पाटील हे होते. प्राथमिक विभागाचे शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. आभार प्रा.आशिष गुजराथी यांनी मानले. यशस्वितेसाठी रासेयो प्रमुख प्रा.गुजराथी, प्रा.उपासनी तसेच सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.